D.E.S. SAS Institute of Management Studies

04 | 27/9/2010

Inward No.................. Date..............

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३ महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.
तार EDUTECH E-mail Desk2@dte.org.in Internet http://www.dte.org.in

क्रमांक २/एनजीसी/एमएमएस/मान्यता/२०१० ९१८९
दिनांक 27 SEP 2010.

प्रति,
संचालक,
एसएएस इन्स्टिटयुट ऑफ मॅनेजमेंट स्टडिज,
साईधाम कॉम्प्लेक्सजवळ, सरवली, बोईसर,
ठाणे-४०१ ५०१.

**(Institute Code:-3358)**

विषय : शैक्षणिक वर्ष २०१०-११ पासून विना-अनुदान तत्वावर नवीन एमएमएस (व्यवस्थापनशास्त्र) या पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाची संस्था सुरु करण्यास परवानगी देण्याबाबत.

संदर्भ : १. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेचे पत्र क्र.वेस्ट/१-३१३४९३१/न्यू. दि.१३ जुलै,२०१०.
२. शासन निर्णय क्र.संकिर्ण-२०१०/(१६५/२०१०)/तांशि-४, दि.३० जुन, २०१०

उपरोक्त विषया संदर्भात आपणास कळविण्यात येते की, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने दिलेल्या मान्यतेस अनुसरुन शासनाने वरील संदर्भाधीन शासन निर्णयान्वये आपल्या संस्थेला शैक्षणिक वर्ष २०१०-११ पासून विना-अनुदान तत्वावर नवीन एम.एम.एस.व्यवस्थापनशास्त्र ह्या पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाची नवीन संस्था खाली दर्शविलेल्या प्रवेशक्षमतेसह सुरु करण्यास विहित अटींच्या अधिन राहून परवानगी दिलेली आहे

| अ.क्र. | अभ्यासक्रम | प्रवेशक्षमता |
|---|---|---|
| १ | एमएमएस | ६० |

सदर अटींपैकी आपण शासन निर्णयात नमूद केलेल्या अटी पालन करण्याचे नोंदणीकृत हमीपत्र रु.१००/- च्या स्टॅम्पपेपरवर या संचालनालयास सादर केलेले आहे.

विहित केलेल्या अटींपैकी उरलेल्या खालील अटी व शर्तींच्या अधिन राहून एमएमएस ह्या पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाची नवीन संस्था सन २०१०-११ पासून विना अनुदान तत्वावर सुरु करण्यास व विद्यार्थ्यांस प्रवेश देण्यास या संचालनालयाकडून अंतिम परवानगी देण्यात येत आहे.

१. सदर मंजूरी कायम विना-अनुदान तत्वावर राहील. सदर अभ्यासक्रमासाठी शासनाकडून आवर्ती व अनावर्ती अनुदान कोणत्याही परिस्थितीत व कोणत्याही कारणास्तव मंजूर केले जाणार नाही.

२. शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग क्रमांक-टिईएम-३३८२/१११८३६/(१२०)/तांशि-१ अ. दिनांक २१ मे, १९८३ अन्वये विना-अनुदान तंत्रशिक्षण संस्थांना शासनाने विहित केलेल्या अटी व शर्ती आपणास बंधनकारक असतील.

३. संस्थेने अभ्यासक्रम चालविण्यास पूर्णवेळ शिक्षकवृंद कर्मचारी नेमावे व शासन व अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद यांच्या नियमाप्रमाणे वेतन व भत्ते कर्मचा-यांना देण्यात यावे. शिक्षक व इतर कर्मचा-यांच्या वेतन व भत्ते इत्यादीबाबत तसेच विद्यार्थ्यांकडून या संचालनालयाकडे तक्रारी आल्यास किंवा न्यायालयीन प्रकरण उद्भवल्यास संस्थेवर कडक कारवाई करण्यात येईल व होणा-या परिणामास सर्वस्वी संस्था जबाबदार राहील.

४. संस्थेने एमएमएस ह्या पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी नियतठेव म्हणून रु. ७.०० लाख बॅसीन कॅथॉलिक को-ऑप-बँक लिमिटेड, शाखा, बोईसर येथे पावती क्र.६८७२०१, दि.१८.०९.२०१० अन्वये संस्थेचे सचिव व संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या संयुक्त खात्यात ५ वर्षासाठी जमा केलेले आहेत. तसेच द्वितीय वर्षासाठी पुढील शैक्षणिक वर्ष सुरु होण्यापूर्वी रु. ६.०० लाख संयुक्त खात्यात जमा करणे आवश्यक आहे याची नोंद घ्यावी.

तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.
तार - EDUTECH E-mail : Desk2@dte.org.in Internet : http://www.dte.org.in

क्रमांक : २/एनजीसी/मान्यता/२०११/ 289
दिनांक :

प्रति,
संचालक,
एसएएस इन्स्टिट्युट ऑफ मॅनेजमेंट स्टडिज,
साईधाम कॉम्प्लेक्स जवळ
सरावली दोईसर,
जिल्हा-ठाणे-४०१ ५०१.

D.E.S. SAS Institute of Management Studies

Inward No. 10 Date 15/2/2012

**(Institute Code3358)**

विषय : शैक्षणिक वर्ष २०११-१२ पासून विना-अनुदान तत्वावर व्यवस्थापन संस्थेमध्ये पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशक्षमतेत बदल करण्यास परवानगी देण्याबाबत.

संदर्भ : शासन निर्णय, क्रमांक-संकिर्ण-२०११/(१५७/२०११)/ताशि-४,दि. ३० जून, २०११

उपरोक्त विषया संदर्भात आपणास कळविण्यात येते की, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने दिलेल्या मान्यतेस अनुसरुन शासनाने वरील संदर्भाधीन शासन निर्णयान्वये आपल्या संस्थेला शैक्षणिक वर्ष २०११-१२ पासून विना अनुदान तत्वावर एमबीए या पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशक्षमतेत खालीलप्रमाणे बदल करण्यास विहित अटींच्या अधिन राहून परवानगी दिलेली आहे.

| अ.क्र. | अभ्यासक्रम | प्रवेशक्षमता |
|---|---|---|
| १. | एमएमएस | ६०-१२० |

सदर अभ्यासक्रमाच्या वाढीव प्रवेशक्षमतेसाठी रु.१.०० लाख, बॅसीन कॅथॉलिक को-ऑप.बॅंक लिमिटेड, शाखा दोईसर येथे पावती क्र. ६८७८२५, दिनांक २८.०१.२०१२ अन्वये संस्थेचे अध्यक्ष व संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई संयुक्त खात्यात ५ वर्षासाठी जमा केलेले आहेत. तसेच १००/- च्या स्टॅम्प पेपरवर शर्ती व अटी मान्य असल्याबाबतचे नोंदणीकृत हमीपत्र या संचालनालयास सादर केलेले आहे. तरी वरील अभ्यासक्रमाच्या प्रवेशक्षमतावाढीस व विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यास शैक्षणिक वर्ष २०११-१२ पासून या संचालनालयाकडून खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून मंजूरी देण्यात येत आहे.

१. सदर अभ्यासक्रमाच्या वाढीव प्रवेशक्षमतेस कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, मुंबई यांची संलग्नता घ्यावी लागेल.

२. प्रवेशक्षमता वाढीस दिलेली मंजूरी विना-अनुदान तत्वावर राहील. त्यासाठी कोणत्याही प्रकारचे आवर्ती व अनावर्ती अनुदान शासनाकडून मंजूर केले जाणार नाही.



DEEP EDUCATION SOCIETY
Chairman

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३.महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.
तार · EDUTECH E-mail : Desk2@dte.org.in Internet : http://www.dte.org.in

क्रमांक : २/एनजीसी/मान्यता/२०१४/ (४V

दिनांक : 21 JUL 2014

प्रति,
प्राचार्य,
टत्स्कर इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज,
साईधाम कॉम्प्लेक्स जवळ,
सरवली, बोईसर,
ठाणे – ४०१ ५०१

## (Institute Code 3358)

विषय : शैक्षणिक वर्ष २०१२-१३ पासून विना-अनुदान तत्वावर नवीन पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यास परवानगी देण्याबाबत.

संदर्भ : १. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेचे पत्र क्र. वेस्टर्न/१-२०१३२७९३०९/२०१४/ईओए दि. ०४ जून, २०१४.
२.शासन निर्णय, क्रमांक- टीईएम -२०१४/प्र.क्र.१५१(ब)/तांशि-४ दि. ३ जुलै, २०१४.

उपरोक्त विषया संदर्भात आपणास कळविण्यात येते की, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने दिलेल्या मान्यतेस अनुसरुन शासनाने वरील संदर्भाधीन शासन निर्णयान्वये आपल्या संस्थेला शैक्षणिक वर्ष २०१४-१५ पासून विना-अनुदान तत्वावर खालील प्रमाणे नवीन पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी विहित अटींच्या अधिन राहून परवानगी दिलेली आहे.

| अ.क्र. | अभ्यासक्रमाचे नांव | प्रवेशक्षमता |
|---|---|---|
| ०१. | एमएमएस (द्वितीय पाळी) | ६०* |

* येथे असे नमूद करण्यात येते की, उपरोक्त अभ्यासक्रमासाठी संदर्भाधिन शासन निर्णयामधील अट क्र.१४ नुसार प्रवेशित विद्यार्थ्यांना राज्य शासनामार्फत राबविण्यात येणारी फी प्रतिपूर्तीची योजना लागू राहणार नाही. याबाबतची सूचना संस्था स्तरावरुन विद्यार्थ्यांना देण्यात यावी तसेच याबाबतची माहिती संस्थेच्या संकेतस्थळावरुन ठळकपणे नमूद करावी.

सदर अटींपैकी आपण शासन निर्णयात नमूद केलेल्या अटींचे पालन करण्याचे नोंदणीकृत हमीपत्र या संचालनालयास सादर केले आहे.

विहित केलेल्या अटींपैकी खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून शैक्षणिक वर्ष २०१४-१५ पासून विना अनुदान तत्वावर वरीलप्रमाणे नवीन पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यांसाठी व विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यास या संचालनालयाकडून अंतिम परवानगी देण्यात येत आहे.

१. सदर मंजूरी कायम विना-अनुदान तत्वावर राहील. सदर अभ्यासक्रमासाठी शासनाकडून आवर्ती व अनावर्ती अनुदान कोणत्याही परिस्थितीत व कोणत्याही कारणास्तव मंजूर केले जाणार नाही.
२. शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग क्र.टिईएम-३३८२/१११८३६/(१९०)/तांशि-१, दि. २१ मे, १९८३ अनवये विना-अनुदान तंत्रशिक्षण संस्थांना शासनाने विहित केलेल्या अटीव शर्ती आपणास बंधनकारक असतील.
३. संस्थेने अभ्यासक्रम चालविण्यास पूर्णवेळ शिक्षकवृंद कर्मचारी नेमावे व शासन व अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद यांच्या नियमाप्रमाणे वेतन व भत्ते कर्मचा-यांना देण्यात यावे. शिक्षक व इतर कर्मचा-यांच्या वेतन व भत्ते इत्यादीबाबत तसेच विद्यार्थ्यांकडून या संचालनालयाकडे तक्रारी आल्यास किंवा न्यायालयीन प्रकरण उद्‌भवल्यास संस्थेवर कडक कारवाई करण्यात येईल व होणा-या परिणामास सर्वस्वी संस्था जबाबदार राहिल.
४. शैक्षणिक वर्ष २०१२-१३ पासून विना अनुदान तत्वावर नवीन पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी नियतठेव म्हणून रु.४.५० लाख पावती क्र.९००५८१ दि. १७.०७.२०१४ अन्वये वॅसीन कॅथॉलिक को.ऑपरेटिव्ह बॅंक लि.